रेग्यूलर दिवाणी मु.नं.७९/९४
निशाण क्र. १४५

## वादीचा पुढील सरतपास वकील श्री. सावंत यांचे मार्फत–

०१. मी कुलअखत्यारपत्र हजर केलेले आहे. माझया वडिलांनी मला अखत्यारपत्र दिलेले आहे. नि.८० वर ते दाखल केलेले आहे. आता मला दाखविणेत आले ते तेच आहे त्यावर माझी व वडिलांची सही,अंगठा व फोटो आहे. ते तहसिलदार कार्यालयात पूर्ण केलेले असून त्यावर कार्यकारी दंडाधिकारी यांचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. नि.१४६ वर अजून एक अखत्यारपत्र दाखल केलेले आहे. आता मला दाखविणेत आले ते तेच आहे त्यावर माझी व वडिलांची सही, अंगठा व फोटो आहे. ते प्रदीप सावंत नोटरी यांचेकडे पूर्ण केलेले असून त्यावर त्यांचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

## वादीचा उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. नेवगी यांचा–

०२. महादेव लक्ष्मण राणे माझे आजोबाचे नाव होते. त्यांना एक मुलगा सहदेव महादेव राणे होते ते माझे वडिल होते. माझया आजोबांना एक चुलत भाऊ होता. शिवराम लक्ष्मण राणे हे माझया आजोबांचे सख्खे भाऊ होते. लक्ष्मण शिवराम राणे हे माझे सख्खे काका. सत्यवती जनार्दन गवस ही माझी चुलत आत्या. सत्वशीला रामकृष्ण सावंत ही माझी चुलत आत्या. अलिकडच्या काळात माझे अखत्यारपत्र रद्द केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सत्वशीला व सत्यवती यांचा दावा मिळकतीत हक्कसंबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती व्यतिरिक्त इन्सुली व क्षेत्रफळ गावात आमच्या इतरही मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, इन्सुली गावात दावा मिळकत सोडून आमची इतर जमीनी आहेत त्याचे किती क्षेत्र आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, इन्सुली गावाला लागून क्षेत्रफळ हे गाव आहे पूर्वी ते एकच होते. हे म्हणणे खरे नाही की, क्षेत्रफळ गावात आमची किती जमीन आहे हे मी सांगू शकतो. ती जमीन ३ हेक्टर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये सत्वशीला व सत्यवती यांचा देखील हक्कसंबंध आहे.

०३. लक्ष्मण शिवराम राणे सध्या इन्सुलीमध्ये असतात. पूर्वी लक्ष्मण शिवराम राणे पोष्ट खात्यात पोष्टमन म्हणून काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील हे इन्सुली गावात रहातात. माझें वडील सहदेव यांना सख्खा भाऊ नाही सख्खी बहिण होती ती वारली. तिला वारस ५ मुलगे व १ मुलगी चंद्रकांत बापू मोरजकर,

महादेव बापू मोरजकर, राजेंद्र बापू मोरजकर , कृष्णा बापू मोरजकर सुर्यकात बापू मोरजकर, मालिनी बापू मोरजकर असे त्यांना वारस आहेत. ती मुले इन्सुली गावातच रहातात. हे म्हणणे खरे आहे की, माझया सख्ख्या आत्याच्या पश्चात तिच्या मुलांचा दावा मिळकतीत हक्कसंबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरील मोरजकर कुटुंबीय प्रतिवादी क्र.१ कंपनीच्या समोर रहाणेस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मोरजकर यांच्या नातेसंबंधातील लोकांनी त्यांची जमीन बांदयाच्या कल्याणकर यांना विकलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सख्खी आत्या व तिची मुले यांना याकामी पक्षकार केलेले नाही.

०४. प्रतिवादी क्र.३ शिवदास यांना मी ओळखू शकतो आणि बाकीचे प्रतिवादी क्र.२,४,५,६ यांना मी ओळखू शकत नाही. माझा जन्म डिसेंबर १९७१ मध्ये झाला. दाव्याचे कामकाज मी १९९४ पासून पहात आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करताना त्यावर वडिलांच्या सहया आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करताना प्रतिवादी क्र. ७ म्हणून नारायण होते, त्याचे नाव न्यायालयाचे आदेशाने कमी करण्यात आले हे मला माहित आहे. नारायण हे माझे सख्खे मोठे भाऊ आहेत. नारायण व मी वेगवेगळे रहातो. वडील सहदेव हे सध्या नारायणकडे रहातात. मी शेती करतो. नारायण हा पूर्वी नोकरी करायचा आता शेती करतो. हे म्हणणे खरे आहे की, नारायण हा प्रतिवादी क्र.१ कंपनीत नोकरीस होता. आमच्या कुटुंबातील इतर कोणीही प्रतिवादी क्र.१ च्या कंपनीमध्ये नोकरीस नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कुटुंबातील इतर लोकांनी प्रतिवादी क्र.१ कंपनीत नोकरी मिळावी त्यावेळी आमची ती मागणी होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी ती मागणी पूर्ण झाली नाही. जयानंद मठकर, सावंतवाडीचे माजी आमदार व कामगार नेते यांना मी ओळखतो. ते जिल्हाचे कामगार नेते होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ७ नारायण हे युनियनचे लीडर होते. हे म्हणणे खरे आहे की, मालक वर्ग व युनियन यांच्यात वाद असायचे. हे म्हणणे खरे आहे की, काही प्रकरणे लेबर कोर्टात देखील गेली होती. मी काही वर्षे सावंतवाडी माजगांव येथे ऑईल फॅक्टरीमध्ये कामगार म्हणून दोन तीन वर्षे नोकरीस होतो. त्यामुळे कामगार न्यायालयाबाबत व त्यांचे हक्काबाबत मला थोडी फार माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ व त्यांचे कामगार ज्याचे युनियन लीडर नारायण माझा भाऊ होता. त्यांचे वाद कामगार न्यायालयापर्यत गेले होते हे मला माहित आहे. हे मला सांगता येणार नाही की, दावा दाखल करताना मी वडिलाबरोबर आलो होतो. हे मला सांगता येणार नाही की, माझा भाऊ नारायण यास प्रतिवादी क्र. ७ का केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी,माझे वडील व भाऊ याच्याशी चर्चा करुन

दाव्यासंदर्भात माहिती घेतली होती.   मी नारायण यास प्रतिवादी क्र. ७ का केले याबाबत वडिलांकडे चौकशी केली होती. नारायण यांचे नाव दावा मिळकतीच्या सातबाराला असल्याने त्याला पक्षकार केले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझाही दावा मिळकतीत हक्कसंबंध आहे. माझया म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीत व इतर मिळकतीत आमची तोंडी वाटपे झालेली आहेत.  हे मी सांगू शकत नाही की, सत्यवती व सत्वशीला यांना त्यात हिस्सा दिलेला आहे किंवा कसे

**प्रतिवादीच्या वकिलांनी विनंती केली की महत्वाच्या मुद्दयावर सविस्तरपणे उलटतपास घ्यावा लागेल त्यामुळे पुढिल तारखेपर्यत तो तहकूब करावा. सबब प्रतिवादीच्या वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/—

(एस.एच.पन्हाळे)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
**सावंतवाडी.**

दिनांकः— १९/०४/२०१८.